अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । गुरुवार
०५.११.२०२६

वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २७६ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

थोडक्यात

ट्रम्प करतात मोदींना नियंत्रित : गांधींनी केला दावा, पुन्हा दिले चर्चेचे आव्हान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

संगरुर – काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवारी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना समोरासमोर चर्चेचे आव्हान दिले. पंतप्रधान मोदी हे 'देशद्रोही' आहेत आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या इशाऱ्यावर ते काम करतात हे आपण पाच मिनिटांत सिद्ध करू शकतो, असा दावा त्यांनी केला. संगरूर येथे काँग्रेस पक्षाच्या 'इन्साफ रॅली'ला संबोधित करताना गांधी म्हणाले की, मोदी त्यांच्यासोबत चर्चेसाठी एका टेबलावर बसायला तयार होणार नाहीत. चर्चेसाठी पंतप्रधान कोणालाही न्यायाधीश म्हणून निवडू शकतात आणि ठिकाणही ठरवू शकतात, असेही ते म्हणाले. काल मी मोदींना समोरासमोर चर्चेचे आव्हान दिले. या चर्चेसाठी ते कोणालाही न्यायाधीश बनवू शकतात.

'२४ तासांच्या आत कोर्टात हजर करा, नाहीतर मुक्त करा!'

अटकेच्या नियमांवर सुप्रीम कोर्टाची कडक भूमिका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

चंद्रपूर – एखाद्या व्यक्तीला अटक करण्यापूर्वी ताब्यात घेणे आणि औपचारिक अटक करणे यामध्ये कोणताही कृत्रिम फरक करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

मॅजिस्ट्रेटसमोर हजर करण्याची २४ तासांची मुदत ही औपचारिक अटकेपासून नव्हे, तर व्यक्तीला ताब्यात घेतल्याच्या क्षणापासून सुरू होते, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्या. उज्ज्वल भुयान आणि न्या. अतुल एस. चांदुरकर यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला.

न्यायालयाने म्हटले आहे की, ताब्यात घेतलेल्या व्यक्तीला २४ तासांच्या आत जवळच्या मॅजिस्ट्रेटसमोर हजर करणे हे संविधानाच्या अनुच्छेद २२ (२) अंतर्गत दिलेले



मूलभूत हक्क आहे. २४ तासांची मोजणी कधीपासून? अनेकदा तपास यंत्रणा असा दावा करतात की, व्यक्तीला आधी फक्त चौकशीसाठी बोलावले होते, ताब्यात घेतले नव्हते.

चौकशी, झडती किंवा जप्तीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच औपचारिक अटक दाखवली जाते. त्यामुळे २४ तासांची मुदत तेव्हापासून सुरू होते, असा युक्तिवाद केला जातो. सर्वोच्च न्यायालयाने हा युक्तिवाद पूर्णपणे फेटाळला आहे. न्यायालयाने सांगितले की, अनुच्छेद २२ (२) आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिताच्या कलम ५६ च्या तरतुदींनुसार, व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर बंधन आले, त्याला जाण्या-येण्यावर निर्बंध घातले गेले, तर तोच क्षण ताब्याचा क्षण मानला जाईल. चौकशीत गेलेला वेळ हा २४ तासांच्या मर्यादेबाहेर ठेवता येणार नाही.

संविधानात फक्त एकच अपवाद न्यायालयाने स्पष्ट केले की, संविधानाने २४ तासांच्या नियमाला फक्त एकच अपवाद दिला आहे. तीन उच्च न्यायालयांचे निर्णय रद्द या निकालाद्वारे सर्वोच्च न्यायालयाने तीन उच्च न्यायालयांच्या निर्णयांशी असहमती दर्शवली आहे.

ओडिशा उच्च न्यायालयाच्या आर्यमन पटनाईक प्रकरणातील, केरळ उच्च न्यायालयाच्या अरुण के. थॉमस प्रकरणातील आणि मद्रास उच्च न्यायालयाच्या कन्नन प्रकरणातील निर्णयांमध्ये असे म्हटले होते की, अटकेपूर्वी ताब्यात घालवलेला वेळ हा अनुच्छेद २२ अंतर्गत २४ तासांच्या कालावधीतून वगळता येतो.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, हे निर्णय अनुच्छेद २२ (२) अंतर्गत योग्य कायदेशीर स्थिती दर्शवत नाहीत. त्यामुळे ते आता लागू राहणार नाहीत.


बांधकामाधीन तीन मजली इमारत कोसळली

दोघांचा मृत्यू, एक जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

नवी दिल्ली – दिल्लीतील चावडी बाजार परिसरात गुरुवारी (दि. ५) सकाळी तीन मजली बांधकामाधीन इमारत कोसळल्याची धक्कादायक घटना घडली. या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला असून, एक जण जखमी झाला आहे. चावडी बाजार मेट्रो स्थानकाजवळील गली सितारा येथे ही घटना घडली. इमारत कोसळल्याची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि बचाव पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांचा शोध घेण्यासाठी बचावकार्य हाती घेण्यात आलं.

गजबजलेल्या बाजारपेठेत इमारत कोसळली 'पीटीआय'ने दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी ९.५० वाजण्याच्या सुमारास इमारत कोसळल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळाली.



त्यानंतर अग्निशमन दलाच्या सहा गाड्या आणि बचाव पथकं घटनास्थळी दाखल झाली. वरिष्ठ अधिकारीही घटनास्थळी पोहोचले. या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला, तर एक जण जखमी झाला. चावडी बाजार हा जुन्या दिल्लीतील गजबजलेला व्यापारी परिसर आहे. येथील रस्ते आणि गल्ल्या अरुंद असून, दिवसभर व्यापारी आणि ग्राहकांची मोठी वदर्ळ असते. दिवाळी जवळ आल्याने बाजारात खरेदीसाठी येणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. अशा वेळी इमारत कोसळल्याने परिसरात खळबळ उडाली. एक दिवस आधी १६० वर्षे जुनी इमारतही कोसळली विशेष म्हणजे, या दुर्घटनेच्या एक दिवस आधीच चांदनी चौकातील ऐतिहासिक टाऊन हॉल इमारतीचा काही भाग कोसळला होता. तब्बल १६० वर्षांहून अधिक जुनी ही इमारत दिल्ली महापालिकेच्या मालकीची असून, तिला संरक्षित वारसा वास्तूचा दर्जा आहे.

या इमारतीच्या पहिल्या मजल्याचा काही भाग, छताचे लाकडी आधार, मुख्य प्रवेशद्वाराजवळील भिंती आणि प्रवेशद्वारावरील घड्याळाचा भाग कोसळल्याचं वृत्त आहे. जुन्या इमारतींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर चांदनी चौकातील टाऊन हॉलमध्ये पूर्वी दिल्ली महापालिकेचं मुख्य कार्यालय होतं. मात्र, २०११-१२ मध्ये महापालिकेचं कार्यालय दुसरीकडे हलवण्यात आलं. त्यानंतर या इमारतीचा फारसा वापर होत नव्हता.

गोकूळवर संचालक नेमले नसते तर पुन्हा निवडणूक घ्यावी लागली असती!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात 'गोकूळ'च्या कारभारावरून राज्य सरकार आणि विरोधकांमध्ये संघर्ष सुरू झाला आहे.

संघावर राज्य सरकारने चार संचालकांची नियुक्ती केल्यानंतर विरोधकांनी सरकारवर संघ ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला आहे. मात्र, अध्यक्ष निवडीसाठी आवश्यक असलेला कोरम पूर्ण होत नसल्याने निर्माण झालेला पेच सोडवण्यासाठीच सरकारने हा निर्णय घेतल्याचे स्पष्टीकरण वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले. चार संचालकांची



नियुक्ती केली नसती, तर नियमानुसार गोकूळवर प्रशासक नेमून पुन्हा निवडणूक घ्यावी लागली असती, असा दावाही त्यांनी केला. गोकूळच्या निवडणुकीत काँग्रेसचे १३, तर महायुतीचे १२ संचालक निवडून आले आहेत. मात्र, संघाच्या उपविधीनुसार अध्यक्ष निवडीसाठी १४ सदस्यांचा कोरम आवश्यक आहे. पहिल्या बैठकीला विरोधी पक्षाचे १२ सदस्य अनुपस्थित राहिल्याने कोरम पूर्ण होऊ शकला नाही. त्यामुळे अध्यक्ष निवडीची प्रक्रिया रखडली.

पुढील बैठक १० तारखेला झाली असती, तरीही तीच परिस्थिती निर्माण झाली असती, असे मुश्रीफ यांनी सांगितले. कोरमची अट पूर्ण झाल्याशिवाय अध्यक्ष निवडता येत नाही आणि बैठकही घेता येत नाही. बहुमताचा विचार करून ही अट डावलता येत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र सहकारी कायदा आणि गोकूळच्या उपविधीतील तरतुदींनुसार अध्यक्ष निवडीच्या दोन ते तीन बैठका कोरमअभावी तहकूब झाल्यास प्रशासक नियुक्त करण्याची वेळ येते. त्यानंतर पुन्हा निवडणूक घ्यावी लागते. त्यामुळे गोकूळवर प्रशासक येऊन पुन्हा निवडणुकीची प्रक्रिया पार पडण्याची शक्यता होती, असे मुश्रीफ म्हणाले. गोकूळच्या उपविधीत असलेली कोरमची ही अट अन्य सहकारी संस्थांमध्ये नसल्याचा दावाही त्यांनी केला.

बेंजामिन नेतान्याहू यांनी इस्त्रायलला केले सावध

विरोधकांवर गंभीर आरोप करताना : बाहेर इराण, तर देशात...

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

इस्त्रायल – इस्त्रायलमध्ये नव्या सरकारच्या स्थापनेवरून राजकीय हालचालींना वेग आला आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसल्याने सत्ता स्थापनेसाठी विविध पक्षांमध्ये चर्चा सुरू आहे. दरम्यान, इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी देशाच्या सुरक्षेबाबत मोठे विधान करत विरोधी पक्षांवर गंभीर आरोप केले आहेत. इस्त्रायलला बाहेरून इराण आणि त्याच्या सहयोगी गटांकडून धोका असल्याचे सांगतानाच,



देशांतर्गत कट्टरतावादही मोठे आव्हान बनत असल्याचे नेतन्याहू यांनी म्हटले आहे. विरोधक दहशतवादाचे समर्थन करणाऱ्या पक्षांच्या मदतीने सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

नेतन्याहूंचा कट्टरतावादावर निशाणा बेंजामिन नेतन्याहू यांनी गुरुवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर देशाच्या सुरक्षेबाबत आपली भूमिका मांडली. त्यांच्या म्हणण्यानुसार, कट्टरतावादी इस्लाम ही केवळ इस्त्रायलची समस्या नसून युरोपातील अनेक देशांसाठीही मोठे आव्हान बनत आहे. इराण आणि त्याच्या सहयोगी गटांकडून इस्त्रायलला बाह्य धोका निर्माण होत आहे, तर देशांतर्गत इस्लामवादी पक्षांमुळे अंतर्गत सुरक्षा आव्हाने वाढत असल्याचा दावा त्यांनी केला. या परिस्थितीत देशाच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे नेतन्याहू यांनी स्पष्ट केले. विरोधकांवर हमास समर्थक पक्षांच्या मदतीने सरकार बनवण्याचा आरोप इस्त्रायलमधील विरोधी पक्षांवर टीका करताना नेतन्याहू यांनी गंभीर आरोप केले आहेत.

पायल झांबरे मृत्यूप्रकरणी सासू-सासऱ्यांना अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

पुणे – आयटी अभियंता पायल झांबरे यांच्या मृत्यूप्रकरणी स्वारगेट पोलिसांनी बुधवारी त्यांच्या सासू आणि सासऱ्यांना अटक केली. मंगल अरविंद झांबरे (५८) आणि अरविंद झांबरे (६८) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. पायल यांचे पती अक्षय अरविंद झांबरे यांना यापूर्वीच अटक करण्यात आली आहे.

पायल यांचा सासरी हुंडा, पैसे आणि सोन्यासाठी शारीरिक व मानसिक छळ केला जात असल्याचा आरोप आहे. या छळाला कंटाळून



त्यांनी २ नोव्हेंबर रोजी टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

पायल यांच्या मृत्यूनंतर त्यांचे सासू-सासरे रुग्णालयात दाखल झाले होते. बुधवारी सकाळी उपचारानंतर डॉक्टरांनी त्यांना घरी जाण्याची परवानगी दिल्यानंतर पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोलीस ठाण्यात आणून रीतसर अटक करण्यात आली. दरम्यान, पती अक्षय झांबरे याला न्यायालयाने ७ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणातील छळाचे आरोप आणि पायल यांच्या मृत्यूशी संबंधित परिस्थितीचा स्वारगेट पोलीस अधिक तपास करत आहेत.



दुष्काळ व पाणीटंचाईच्या प्रश्नावर आमदार उमेश यावलकर आक्रमक

संत्रा-मोसंबीच्या बागा वाचविण्यासाठी शासनाकडे विविध मागण्या

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि आगामी काळात निर्माण होणारी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता मोर्शी-वरूड विधानसभा मतदारसंघातील शेतकरी, फळबाग उत्पादक आणि ग्रामीण नागरिकांच्या विविध प्रश्नांवर आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी आक्रमक भूमिका घेत शासनाचे लक्ष वेधले.

२ नोव्हेंबर २०२६ रोजी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयातील पालकमंत्री भवन येथे पालकमंत्री तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित दुष्काळ व पाणीटंचाई आढावा बैठकीत त्यांनी विविध महत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या. मोर्शी-वरूड तालुका हा संत्रा व मोसंबीच्या फळबागांसाठी प्रसिद्ध असून, हजारो शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती या फळबागांवर अवलंबून आहे. मात्र, पाण्याअभावी अनेक वर्षांच्या मेहनतीने उभ्या केलेल्या फळबागा धोक्यात आल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना नवीन बोअरवेल घेण्यासाठी तसेच अस्तित्वातील विहिरींचे खोलीकरण करण्यासाठी खुली सूट द्यावी आणि आवश्यक प्रशासकीय परवानग्या सुलभ कराव्यात, अशी आग्रही मागणी यावलकर यांनी केली. पीककर्जाच्या अडचणी दूर करून शेतकऱ्यांना दिलासा द्या दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळणे आवश्यक असताना बँकांकडून पीककर्ज मिळिवताना अनेक अडचणी येत असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

खासगी बँकांच्या जुन्या कर्जाचा बोजा सातबारा उताऱ्यावर कायम असणे, कर्ज सेटलमेंटमुळे सिबिल स्कोअरवर होणारा परिणाम यामुळे अनेक शेतकरी नवीन पीककर्जापासून वंचित राहत आहेत. अशा प्रकरणांचा मानवीय दृष्टिकोनातून विचार करून शेतकऱ्यांना पीककर्ज उपलब्ध करून देण्यासाठी बँकांना योग्य निर्देश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

रखडलेल्या पाणीपुरवठा योजनांना गती देण्याची मागणी ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होऊ नये, यासाठी मतदारसंघातील रखडलेल्या ३५ गाव, ११ गाव, १६ गाव आणि २६ गाव पाणीपुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी आमदार यावलकर यांनी केली. संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देऊन या योजनांना गती द्यावी आणि नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून द्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले. जरूडची शरद उपसा जलसिंचन योजना तातडीने सुरू करा जरूड येथील शरद उपसा जलसिंचन सहकारी संस्थेचे १३ लाख १६ हजार ३२८ रुपयांचे वीजबिल थकीत असल्यामुळे योजनेचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. या योजनेचे ७४५ अल्पभूधारक शेतकरी लाभार्थी असून, सुमारे तीन हजार एकर शेती या योजनेच्या लाभक्षेत्रात येते. त्यामुळे थकीत वीजबिलाचा प्रश्न प्राधान्याने सोडवून ही योजना युद्धपातळीवर सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली. अप्पर वर्धा व नदीच्या पाण्याच्या वापरावरील बंधने दूर करा अप्पर वर्धा प्रकल्प तसेच नदीच्या पाण्यावर आधारित सिंचन व्यवस्थेचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांनी नियमानुसार पाणीपट्टी भरलेली असतानाही सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत फळबागांना पाणी देण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. त्यामुळे पाणीपट्टी भरणाऱ्या शेतकऱ्यांना पूर्वीप्रमाणे सिंचनासाठी पाण्याचा वापर सुरू ठेवता यावा आणि त्यावर अनावश्यक बंधने घालू नयेत, अशी मागणीही त्यांनी केली. चारगड नदीच्या स्वच्छतेसाठी निधी उपलब्ध करून द्या जलसंधारण आणि भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी चारगड नदीच्या सुमारे दहा किलोमीटर पात्राची स्वच्छता व गाळ काढण्याचे काम हाती घेण्याची मागणी आमदार यावलकर यांनी केली. नदीपात्रातील अडथळे दूर करून पावसाचे पाणी अडविणे व साठविण्यासाठी आवश्यक कामे करण्यात यावीत. यासाठी शासनाने पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. शेतकरी व नागरिकांच्या प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्याचा आग्रह या आढावा बैठकीत आमदार चंदूभाऊ यावलकर यांनी केवळ पाणीटंचाईच नव्हे, तर शेतकऱ्यांचे पीककर्ज, संत्रा-मोसंबीच्या फळबागांचे संरक्षण, सिंचन व्यवस्था, ग्रामीण पाणीपुरवठा आणि जलसंधारण अशा विविध महत्त्वपूर्ण विषयांवर पालकमंत्र्यांचे लक्ष वेधले.

दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये, पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होऊ नये आणि अनेक वर्षांच्या कष्टाने उभ्या केलेल्या फळबागा वाचविता याव्यात, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी आग्रही मागणी त्यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली.

३१ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेनंतर

माणिकदास बेलुरकर यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – जागृत नवयुवक शिक्षण संस्था वरुड द्वारा संचालित पी.व्ही.साबळे जागृत विद्यालय सुरळी व माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय वरुड येथील सहायक शिक्षक माणिकदास बेलूरकर यांच्या ३१ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेनंतर आयोजित सेवापूर्ती सत्कार सोहळा नुकताच शहरातील यशोदाई सभागृह येथे उत्साहात पार पडला.

माणिकदास बेलूरकर यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जडणघडणीत मोलाचे योगदान दिले. यामध्ये ग्रंथालय व वाचक चळवळ, बाल सुसंस्कार शिबिरे, व्यायामशाळा, युवक शिबिरे, ग्रामजयंती अभियान आदी उपक्रमांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

या सेवाकार्याची दखल घेत आयोजित करण्यात आलेल्या सपत्नीक सत्कार सोहळ्यात अ.भा.श्री गुरुदेव सेवा मंडळाचे आजीवन प्रचारक, राष्ट्रधर्म प्रचार समितीचे सचिव तथा माजी मुख्याध्यापक रामदास चोरोडे आणि विदर्भ साहित्य संघ व शारदा भगिनी मंडळाच्या अध्यक्षा रेखा आजनकर यांचे हस्ते माणिकदास बेलूरकर व पत्नी सविता बेलूरकर यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे माजी प्राचार्य व विश्वस्त एस.एन.बेलसरे, सहसचिव प्रा.अरुण वानखडे, माजी प्राचार्य शरद तिनखेडे, भा.रा.बेलूरकर, माया नांदूरकर, सविता बेलूरकर आणि डॉ.कार्तिक बेलूरकर यांनी मनोगत व्यक्त करुन बेलूरकर गुरुजींच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाचा गौरव केला. कार्यक्रमाला सेवाग्राम आश्रमाचे गजानन आंबुलकर, राष्ट्रीय नकलाकार हरिभाऊ बेलूरकर, सामाजिक कार्यकर्ते उद्धव साबळे, विदर्भ माध्यमिक संघटनेचे संघटक श्रावण बरडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे संचालन दिलीप बुरंगे यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक अजय देशपांडे तर आभार सुरेंद्रकुमार यांनी केले.

सोहळ्याच्या यशस्वितेसाठी निमंत्रक डॉ.कार्तिक बेलूरकर, प्रशांत नागमोते, मनिष कुबडे, नितीन सिनकर, सुभाष राऊत, मोहन साबळे, जगदीश गुल्हाने, अनुराग धानोरकर, तन्वी जांभूळकर, राजू सैनी, गजानन राजनकर, महेंद्र तळखंडकर, नगरसेवक प्रवीण सावरकर, नगरसेवक गौरव इंगळे, उद्धव भड, राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज कॉलनीवासीयांनी अथक परिश्रम घेतले.

धरण उशाला तरी बेलोनावासीयांच्या घशाला कोरड


उपाययोजना करण्याची सरपंच जयश्री धोटे यांची मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

हिवरखेड – येथून अवघ्या ३ किलोमीटर अंतरावर असलेल्या बेलोना गावाला गेल्या अनेक वर्षांपासून भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे, बेलोना गाव अप्पर वर्धा धरणालगत असून धरणाचे बॅकवॉटर गावाच्या शिवारात आहे, असे असतांनाही गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. बेलोना गावातील पाणीटंचाईची गंभीर समस्या लक्षात घेता सरपंच जयश्री धोटे यांनी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या उपअभियंत्यांकडे नवीन विहीर बांधणे आणि सुमारे दोन किलोमीटर लांबीची नवीन पाइपलाईन टाकण्याची मागणी लावुन धरली आहे.



गावातील सद्य:चे पाण्याचे स्रोत अपुरे पडत असून, विशेषतः उन्हाळ्यात पाणीटंचाईची समस्या अधिक गंभीर बनते. परिणामी, ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी धावपळ करावी लागत आहे. गावातील नागरिकांना नियमित व मुबलक पाणीपुरवठा व्हावा, यासाठी नवीन विहीर बांधणे आणि आवश्यक ठिकाणी नवीन पाइपलाईन टाकणे अत्यंत गरजेचे असून या गंभीर समस्येची दखल घेऊन ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने नवीन विहिरीला मंजुरी द्यावी तसेच पाइपलाइनच्या कामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, या पाणीटंचाईच्या समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी आमदार उमेश उर्फ चंदु ऊर्फ यावलकर यांनी आश्वासन दिले असल्याची माहिती सरपंच जयश्री धोटे यांनी दिली. धरण जवळ असूनही पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याची परिस्थिती बदलण्यासाठी संबंधित विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा बेलोनावासीयांकडून व्यक्त होत आहे.



वरुड : डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ अकोलाचे कार्यकारी परिषद सदस्य मोरेश्वर वानखडे यांनी मुंबई येथे राज्याचे कृषी मंत्री दत्ता मामा भरणे यांची भेट घेत वरुडची संत्रा भेट दिली आणि संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या.

स्पेस आयआयटी ॲन्ड मेडिकलच्या वतीने 'दहावीनंतर पुढे काय?' विशेष करिअर कौन्सिलिंग कार्यशाळा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – विद्यार्थ्यांच्या मनातील या प्रश्नांना योग्य उत्तरे मिळावीत, त्यांच्या आवडी निवडी, क्षमता आणि भविष्यातील ध्येयांचा विचार करुन त्यांना करिअरची योग्य दिशा निवडता यावी, या उद्देशाने स्पेस आयआयटी ॲन्ड मेडिकलच्या वतीने 'दहावीनंतर पुढे काय?' या विषयावर विशेष करिअर कौन्सिलिंग कार्यशाळेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या कार्यशाळेला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यशाळेत आयआयटी मध्ये शिक्षण घेतलेले अनुभवी व विषयतज्ज्ञ मार्गदर्शक प्रा.सतीशकुमार सिंग (गणित), प्रा.विकास पटेल (भौतिकशास्त्र) आणि प्रा.प्रिन्स गौतम (रसायनशास्त्र), डॉ.प्राची ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक पर्यायांची सविस्तर माहिती देत मार्गदर्शन केले. मार्गदर्शना दरम्यान दहावीनंतर उपलब्ध असलेल्या विज्ञान, वाणिज्य, कला तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची वैशिष्ट्ये, त्यांचे शैक्षणिक महत्त्व, भविष्यातील रोजगाराच्या संधी आणि करिअरच्या विविध वाटा याविषयी सखोल विवेचन करण्यात आले. केवळ पारंपरिक अभ्यासक्रमांचा विचार न करता विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार उपलब्ध असलेल्या विविध क्षेत्रांचा अभ्यास करावा, असे आवाहन तज्ज्ञांनी केले.

जेईई, नीट, एमएचटी-सीईटी परीक्षांच्या तयारीविषयी विशेष मार्गदर्शन

अभियांत्रिकी आणि वैद्यकीय क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गएए, छएएढ आणि चकढ-उएढ या महत्त्वपूर्ण प्रवेश परीक्षांची ओळख करून देण्यात आली. या परीक्षांचे स्वरूप, अभ्यासक्रम, तयारीची दिशा, संकल्पनांची स्पष्टता, नियमित सराव, वेळेचे नियोजन, प्रश्नपत्रिकांचा अभ्यास आणि सातत्यपूर्ण मेहनतीचे महत्त्व या विषयांवर मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती दिली.

स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करण्यासाठी केवळ जास्त वेळ अभ्यास करणे पुरेसे नसून अभ्यासाची योग्य पद्धत, नियोजनबद्ध वेळापत्रक, विषयांची मूलभूत समज, नियमित चाचण्या आणि स्वतःच्या प्रगतीचे मूल्यमापन या बाबी अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले.

गुणांपेक्षा आवड, क्षमता आणि ध्येयाला प्राधान्य द्या!

आजच्या बदलत्या आणि स्पर्धात्मक शैक्षणिक वातावरणात करिअरची निवड करताना केवळ दहावीतील गुण किंवा इतरांच्या अपेक्षांचा विचार न करता विद्यार्थ्यांची नैसर्गिक आवड, बौद्धिक क्षमता, कौशल्ये, व्यक्तिमत्त्व आणि भविष्यातील उद्दिष्टे लक्षात घेणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता वेगळी असते आणि प्रत्येकासाठी यशाचा मार्गही वेगळा असू शकतो. त्यामुळे मित्रांनी निवडलेला अभ्यासक्रम किंवा समाजात प्रचलित असलेला करिअरचा पर्याय निवडण्याऐवजी स्वतःच्या क्षमतेचे योग्य मूल्यमापन करून निर्णय घ्यावा, असा महत्त्वपूर्ण संदेश या कार्यशाळेतून देण्यात आला.

पालकांची भूमिका आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे नियोजन

विद्यार्थ्यांच्या करिअर निवडीमध्ये पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मात्र, विद्यार्थ्यांवर अपेक्षांचे ओझे न टाकता त्यांच्या आवडी समजून घेणे, त्यांना योग्य संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या निर्णयप्रक्रियेत सकारात्मक सहभाग घेणे आवश्यक आहे. पालकांनी आपल्या पाल्याच्या क्षमतेनुसार त्याला प्रोत्साहन द्यावे, तसेच शैक्षणिक पर्यायांची माहिती घेऊन विचारपूर्वक निर्णय घ्यावा, असेही मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेमुळे दहावीनंतरच्या शैक्षणिक वाटचालीसंदर्भात विद्यार्थी व पालकांना विविध पर्यायांची माहिती मिळण्यास मदत झाली. करिअर निवडीबाबत असलेल्या शंकांचे निरसन होऊन भविष्यातील शैक्षणिक नियोजनासाठी एक निश्चित दिशा मिळण्याच्या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरला.

दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये करिअर विषयक जागरुकता निर्माण होण्यास मदत झाली असून स्पेस आयआयटी ॲन्ड मेडिकलच्या या उपक्रमाचे शैक्षणिक क्षेत्रातून स्वागत होत आहे. कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक डॉ प्रियंका इंगोले यांनी प्रास्ताविक अमरदीप खाडे यांनी केले.

संपादकीय

यश मिळवायचे असेल तर नशिबापेक्षा मेहनतीवर विश्वास ठेवा.

जगाला धाक दाखवून महासत्ता टिकवता येईल काय?

अमेरिकेच्या वर्चस्ववादी धोरणांचा जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम; भारताने सावधगिरीने पावले टाकण्याची गरज! जगाच्या राजकारणात अमेरिकेचे स्थान नेहमीच महत्त्वाचे राहिले आहे. मात्र अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या राजकीय कार्यशैलीमुळे जागतिक राजकारणाला एक वेगळीच दिशा मिळताना दिसत आहे. 'अमेरिका फर्स्ट' हा नारा देत ट्रम्प यांनी अमेरिकेचे आर्थिक आणि राजकीय हित सर्वोच्च असल्याचे स्पष्ट केले आहे. परंतु प्रश्न असा आहे की, स्वतःचे हित जपताना जगातील इतर देशांच्या हिताकडे दुर्लक्ष करणे योग्य आहे काय?

ट्रम्प यांची राजकीय शैली ही आक्रमक, स्पष्टवक्ती आणि अनेकदा वादग्रस्त राहिली आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये संवाद, सहकार्य आणि परस्पर विश्वास यांना महत्त्व असते. मात्र ट्रम्प यांची कार्यपद्धती अनेकदा दबावाचे राजकारण करणारी असल्याचे दिसते. व्यापार कर, आयात शुल्क आणि आर्थिक निर्बंध यांचा वापर ते इतर देशांशी वाटाघाटी करताना प्रभावी साधन म्हणून करतात. त्यामुळे जागतिक व्यापार व्यवस्थेत अनिश्चिततेचे वातावरण निर्माण होते.

अमेरिकेच्या आर्थिक हितासाठी इतर देशांवर आयात शुल्क लादण्याच्या धोरणामुळे जागतिक बाजारपेठेवर परिणाम होण्याची शक्यता असते. अशा निर्णयांचा परिणाम केवळ अमेरिका किंवा संबंधित देशांपुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचे पडसाद विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेवरही उमटतात. भारतासारख्या निर्यातप्रधान क्षेत्रांना जागतिक व्यापारातील बदलांचा विचार करून धोरण आखावे लागते.

ट्रम्प यांच्या राजकारणातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे परराष्ट्र धोरण. जागतिक शांतता, युद्धजन्य परिस्थिती, आंतरराष्ट्रीय संघटनांची भूमिका आणि विविध देशांमधील संबंध या प्रत्येक बाबतीत अमेरिकेच्या भूमिकेला मोठे महत्त्व आहे.



पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल : विज्ञानाधिष्ठित जलव्यवस्थापन हीच दुष्काळावर मात करण्याची गुरुकिल्ली

महाराष्ट्र राज्य सध्या पाणीटंचाई आणि दुष्काळसदृश परिस्थितीच्या आव्हानांना सामोरे जात आहे. पावसाचे अनियमित वितरण, भूजल पातळीत होणारी घट, वाढते तापमान, बाष्पीभवन, पाण्याचा अनियंत्रित वापर आणि बदलते हवामान यांमुळे पाणी व्यवस्थापनाचा प्रश्न अधिक गंभीर बनत आहे. २०२६ च्या पावसाळ्यात महाराष्ट्रात सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली असून विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाची तूट विशेष चिंताजनक असल्याचे वृत्त आहे. त्यामुळे आगामी उन्हाळ्यात पिण्याचे पाणी, शेती आणि औद्योगिक क्षेत्रासाठी पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे.

दुष्काळ ही केवळ निसर्गाची समस्या नसून उपलब्ध जलसंपत्तीचे योग्य व्यवस्थापन न झाल्यास ती सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय समस्या बनते. म्हणूनच आज प्रत्येक नागरिकाने पाण्याकडे केवळ नैसर्गिक संसाधन म्हणून न पाहता मर्यादित आणि मौल्यवान संपत्ती म्हणून पाहण्याची गरज आहे.

पाणी व्यवस्थापनात विज्ञानाची भूमिका

रसायनशास्त्राच्या दृष्टिकोनातून पाणी हे जीवनावश्यक रासायनिक संयुग आहे परंतु नैसर्गिक स्रोतांमधील सर्व पाणी पिण्यायोग्य नसते. पाण्यामध्ये विरघळलेले क्षार, जड धातू, नायट्रेट, फ्लोराइड, सेंद्रिय पदार्थ तसेच सूक्ष्मजीव असू शकतात. त्यामुळे पाण्याचे संवर्धन करण्याबरोबरच त्याची गुणवत्ता तपासणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

गावपातळीवर महाविद्यालये, विज्ञान विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहकार्याने पाणी गुणवत्ता तपासणी शिबिरे आयोजित करता येतील. यामुळे दूषित पाणी पिण्यामुळे उदभवणाऱ्या आरोग्यविषयक समस्या टाळण्यास मदत होईल. विशेषतः विहिरी, बोअरवेल आणि सार्वजनिक पाणीपुरवठा स्रोतांची नियमित तपासणी करणे आवश्यक आहे.

पिण्याच्या पाण्याचे संरक्षण :

सर्वप्रथम मानवी जीवनाला प्राधान्य

दुष्काळी परिस्थितीत उपलब्ध पाण्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. घरगुती नळांना गळती असल्यास त्वरित दुरुस्ती करावी, पाण्याच्या टाक्या पूर्ण भरल्यानंतर मोटार बंद करण्यासाठी ऑटोमॅटिक कंट्रोलर बसवावा, दात घासताना, भांडी धुताना आणि आंघोळ करताना पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा, पावसाचे पाणी घराच्या छतावरून पाइपद्वारे साठवण टाकीत जमा करावे, पाणी साठवताना स्वच्छ, झाकण असलेल्या टाक्यांचा वापर करावा, घरगुती वापरातील तुलनेने स्वच्छ उरलेले पाणी झाडांसाठी वापरावे.

विशेष म्हणजे, पावसाचे पाणी साठवताना प्रथम पावसाचे पाणी वेगळे सोडणे, योग्य गाळणी वापरणे आणि साठवण टाकी स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. भूजल पुनर्भरण करताना पाणी योग्य गाळणी व आवश्यक पूर्वप्रक्रियेनंतरच पुनर्भरण संरचनेत सोडावे.

शेतीसाठी पाण्याचा शास्त्रीय वापर : कमी पाण्यात अधिक उत्पादन

महाराष्ट्रातील बहुतांश शेतकरी पावसावर अवलंबून शेती करतात. त्यामुळे पाणीटंचाईचा सर्वाधिक परिणाम शेतीवर होतो. शेतीमध्ये पारंपरिक पद्धतीने पाणी दिल्यास मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होऊ शकतो. यासाठी आधुनिक विज्ञान आणि कृषितंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे.

ठिबक सिंचन : या पद्धतीमध्ये पाणी थेट पिकांच्या मुळांच्या परिसरात दिले जाते. त्यामुळे जमिनीच्या पृष्ठभागावरून होणारे बाष्पीभवन आणि अनावश्यक पाण्याचा वापर कमी करता येतो.

तुषार सिंचन : पावसाप्रमाणे पाण्याचे फवारे पिकांवर सोडले जातात. योग्य परिस्थितीत या पद्धतीने पाण्याचे कार्यक्षम वितरण करता येते.

मातीतील आर्द्रता तपासणी : सोईल मोइसचर सेन्सर वापरून जमिनीत किती ओलावा आहे हे समजते. त्यानुसार सिंचन केल्यास गरजेपेक्षा जास्त पाणी देणे टाळता येते.

पीक नियोजन : कमी पाण्यात येणारी ज्वारी, बाजरी, हरभरा, तूर आणि मूग यांसारख्या पिकांना स्थानिक हवामान व मातीच्या परिस्थितीनुसार प्राधान्य द्यावे. पाणी उपलब्धतेचा विचार न करता ऊस किंवा इतर अधिक पाणी लागणाऱ्या पिकांचे क्षेत्र वाढविणे टाळावे.

मल्चिंग तंत्रज्ञान : पिकांच्या मुळांभोवती जमिनीवर पिकांचे अवशेष, पालापाचोळा किंवा योग्य जैविक आच्छादन टाकल्यास जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यास मदत होते.

शेतकऱ्यांनी शेततळे, बांधबंदिस्ती, समतल चर, नाला खोलीकरण आणि लहान बंधारे यांसारख्या जलसंधारणाच्या उपाययोजना सामूहिक सहभागातून राबवाव्यात. मात्र भूगर्भीय रचना आणि स्थानिक जलवैज्ञानिक परिस्थिती लक्षात घेऊनच पुनर्भरणाची कामे करावीत.

औद्योगिक क्षेत्रात पाण्याचा पुनर्वापर : उद्योगांनी स्वीकारावे जलकार्यक्षम तंत्रज्ञान

औद्योगिकीकरणामुळे रोजगार आणि आर्थिक विकासाला चालना मिळते; परंतु उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. त्यामुळे उद्योगांनी पिण्यायोग्य ताज्या पाण्यावरील अवलंबित्व कमी करणे आवश्यक आहे. यासाठी इफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट च्या माध्यमातून औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करणे, सिवेज ट्रीटमेंट प्लांट द्वारे घरगुती सांडपाण्याचे शुद्धीकरण करणे, रिव्हर्स ऑस्मोसिस, फिल्ट्रेशन आणि ऍक्टिवेटेड कार्बन ट्रीटमेंट यांसारख्या तंत्रज्ञानाचा आवश्यकतेनुसार वापर करणे, कुलिंग टॉवर मधील पाण्याचे पुनर्चक्रण करणे, प्रक्रिया केलेले पाणी बागकाम, औद्योगिक शीतकरण, स्वच्छता आणि योग्य गुणवत्तेची पूर्तता करणाऱ्या इतर कामांसाठी वापरणे, उद्योगांमध्ये वॉटर ऑडिट करून पाण्याचा वापर आणि गळती यांचा नियमित आढावा घेणे हे उपाय आवश्यक आहे.



प्रक्रिया केलेले सांडपाणी कोणत्या कामासाठी वापरायचे हे त्यातील रासायनिक आणि सूक्ष्मजीवशास्त्रीय गुणवत्तेवर अवलंबून असते. औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया न करता ते नद्या, नाले किंवा जमिनीत सोडल्यास भूजल आणि माती प्रदूषित होऊ शकतात. त्यामुळे जलपुनर्वापरासोबत प्रदूषण नियंत्रणही अत्यंत महत्त्वाचे आहे.

सांडपाणी म्हणजे टाकाऊ पदार्थ नव्हे, तर पुनर्वापरयोग्य जलस्रोत

आज जगातील अनेक देशांमध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा विविध कामांसाठी पुनर्वापर केला जातो. भारतातही या संकल्पनेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. घरगुती सांडपाण्याचे दोन प्रकार करता येतात. आंघोळ, हात धुणे आणि कपडे धुणे यांमधून निर्माण होणारे तुलनेने कमी दूषित पाणी म्हणजे ग्रेवॉटर शौचालयातून निर्माण होणारे पाणी म्हणजे ब्लॅकवॉटर. योग्य गाळणी, जैविक प्रक्रिया आणि निर्जंतुकीकरणानंतर ग्रेवॉटर चा वापर बागकाम, शौचालय फ्लशिंग आणि इतर योग्य कामांसाठी करता येतो. यामुळे ताज्या पाण्याची मागणी कमी होऊ शकते.

भूजल पुनर्भरण आणि पावसाचे पाणी साठवण : भविष्यासाठी जलसुरक्षा

पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जाते. हे पाणी अडवून जमिनीत मुरविणे ही काळाची गरज आहे, यासाठी प्रत्येक इमारतीवर रेनवॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था, शेतांमध्ये शेततळी आणि जलसंधारण बंधारे, गावातील तलाव, विहिरी आणि पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, नाल्यांवर योग्य ठिकाणी छोटे बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास आणि वृक्षारोपण, बोअरवेलच्या परिसरात योग्य तांत्रिक निकषांनुसार भूजल पुनर्भरण.

पाणी जमिनीत मुरविल्यामुळे भूजल साठ्याच्या पुनर्भरणास मदत होते. मात्र प्रत्येक ठिकाणी पाणी मुरविण्याची क्षमता आणि भूगर्भातील खडकांची रचना वेगळी असते. त्यामुळे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालीच पुनर्भरण संरचना उभाराव्यात.

दुष्काळी परिस्थितीत नागरिकांनी काय करावे?

दुष्काळावर मात करण्यासाठी केवळ शासनाच्या उपाययोजना पुरेशा नाहीत. प्रत्येक नागरिकाने पाणी बचतीची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे, प्रत्येक कुटुंबाने दैनंदिन पाणी वापराचे नियोजन करावे, सार्वजनिक नळ, पाइपलाइन आणि पाण्याच्या टाक्यांमधील गळती त्वरित प्रशासनाच्या निदर्शनास आणावी, पिण्याच्या पाण्याचा वापर वाहन धुणे, रस्ते धुणे यांसारख्या कामांसाठी करू नये, गावपातळीवर पाणी बचत समित्या स्थापन करून उपलब्ध पाण्याचा हिशेब ठेवावा, विहिरी आणि बोअरवेलमधून अनियंत्रित पाणी उपसा टाळावा, पाणीटंचाईच्या काळात जनावरांसाठी पिण्याचे पाणी आणि चारा उपलब्धतेचे नियोजन करावे, पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी नद्या, तलाव आणि विहिरींमध्ये कचरा व रासायनिक पदार्थ टाकू नयेत, पाणी उपलब्धतेनुसार शेतीचे नियोजन करून आवश्यकतेनुसार कृषी विभागाचा सल्ला घ्यावा.

विज्ञान महाविद्यालयांची सामाजिक जबाबदारी

दुष्काळ निवारण आणि जलसंधारणामध्ये शैक्षणिक संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरू शकते. विशेषतः रसायनशास्त्र विभागामार्फत ग्रामीण भागातील विहिरी, बोअरवेल आणि तलावांच्या पाण्याचे नमुने संकलित करून त्यांचे विश्लेषण करता येईल. विद्यार्थ्यांच्या सहभागातून जलगुणवत्ता तपासणी, पाणी बचत अभियान, जलसाक्षरता व्याख्याने, रेनवॉटर हार्वेस्टिंग प्रात्यक्षिके आणि शेतकऱ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम राबविता येतील. महाविद्यालयांनी ग्रामपंचायत, कृषी विभाग, भूजल सर्वेक्षण विभाग आणि स्थानिक प्रशासन यांच्या सहकार्याने गावनिहाय जलस्रोतांचे नकाशे व पाणी वापराचा प्राथमिक लेखाजोखा तयार करण्यासाठी पुढाकार घ्यावा. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष विज्ञानाचा सामाजिक उपयोग समजेल आणि समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होईल. पाण्याचे व्यवस्थापन ही केवळ शासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी! दुष्काळावर मात करण्यासाठी पाऊस पडण्याची वाट पाहत बसण्यापेक्षा उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे, पावसाचे पाणी साठवणे, भूजल पुनर्भरण करणे, शेतीमध्ये सूक्ष्म सिंचनाचा वापर करणे आणि उद्योगांमध्ये सांडपाण्याचे पुनर्चक्रण करणे आवश्यक आहे. आज आपण पाणी वाचविले तरच उद्याच्या पिढ्यांना सुरक्षित जलसंपत्ती उपलब्ध होईल. पाण्याचे शास्त्रीय व्यवस्थापन, सामूहिक सहभाग आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांच्या माध्यमातून महाराष्ट्र दुष्काळाच्या संकटाला सक्षमपणे सामोरे जाऊ शकतो. पाणी हे केवळ नैसर्गिक संसाधन नाही, तर जीवन, शेती, उद्योग आणि अर्थव्यवस्थेचा आधार आहे. त्यामुळे प्रत्येक थेंबाचा योग्य वापर, प्रत्येक जलस्रोताचे संवर्धन आणि प्रत्येक नागरिकाचा सहभाग हाच पाणीसमृद्ध महाराष्ट्राचा खरा मार्ग आहे.

चला, आजच संकल्प करू या पाणी वाचवू या, पाणी जपू या आणि जलसमृद्ध महाराष्ट्र घडवू या.



प्रा.डॉ.अतुल वंजारी
सहाय्यक प्राध्यापक रसायनशास्त्र विभाग, महात्मा फुले, कला वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय वरुड

दिवाळीचा फराळ आणि माऊली कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटची धमाल!

दिवाळी म्हटली की डोळ्यांसमोर येतात ते रंगीबेरंगी आकाशकंदील, पणत्या, फटाके, फराळ आणि नवीन कपडे! पण हल्लीच्या डिजिटल युगात दिवाळी साजरी करण्याची पद्धतही बदलली आहे. पूर्वी लोक एकमेकांना प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा द्यायचे, आता मात्र शुभेच्छा देण्यासाठी मोबाईल, व्हॉट्सअॅप आणि सोशल मीडियाचा आधार घेतला जातो.

अशाच या डिजिटल दिवाळीत माऊली कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटमध्येही वेगळीच धमाल पाहायला मिळते! दिवाळीच्या सुट्ट्या जाहीर होताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलतो. कारण अभ्यासाला सुट्टी आणि फराळाला ड्युटी सुरू! पण माऊली कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटमध्ये कॉम्प्युटरला सुट्टी असली तरी विद्यार्थ्यांच्या आठवणींना सुट्टी नसते. एखादा विद्यार्थी म्हणतो, 'सर, दिवाळीत कॉम्प्युटर बंद ठेवू का?' तर दुसरा म्हणतो, 'सर, फराळाचा फोटो एडिट करून द्यायचा आहे!' तिसऱ्याची मागणी असते, 'सर, माझा फोटो असा बनवा की यंदा लक्ष्मीपूजनाला लक्ष्मीमाताही माझ्याकडेच पाहतील!' आता सरांनी तरी काय करावे? कॉम्प्युटर शिकवायचा की विद्यार्थ्यांचे फोटो सुंदर बनवायचे, हा प्रश्नच पडतो! दिवाळीत चकली गोल झाली नाही तरी चालेल, लाडू फुटला तरी चालेल; पण कॉम्प्युटरचा पासवर्ड मात्र विसरता कामा नये. कारण दिवाळीनंतर पुन्हा क्लास सुरू झाला की पहिला प्रश्न असतो, 'सर, आपण मागच्या वेळी काय शिकत होतो?' खरं तर दिवाळी हा आनंद, आपुलकी आणि नात्यांचा सण आहे. या सणाच्या निमित्ताने माऊली कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटच्या सर्व विद्यार्थी, पालक आणि हितचिंतकांना मनःपूर्वक शुभेच्छा!



वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

वाढवण बंदर प्रकल्पाविरोधात पालघरमध्ये जनआक्रोश मोर्चा

जल-जमीन-जंगल वाचविण्यासाठी हजारोंचा एल्गार!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





मुंबई – प्रस्तावित वाढवण बंदर प्रकल्प रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी पालघर जिल्ह्यातील वरोर येथे भव्य जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चात कष्टकरी, आदिवासी, मच्छीमार समाजातील हजारो स्त्री-पुरुष सहभागी झाले होते. 'जल-जमीन-जंगल आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं!' अशा बुलंद घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

या जनआक्रोश मोर्चात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ठाणे जिल्ह्यातून अंधश्रद्धा निर्मूलन समिती महाराष्ट्र ट्रस्टचे अध्यक्ष गणेश चिंचोले, राज्य कार्यकारिणी सदस्य प्रा.प्रवीण देशमुख आणि डोंबिवली येथील कार्यकर्ते उदय देशमुख यांनी सहभाग नोंदविला. तसेच पालघर जिल्ह्यातून मिलिंद खानोलकर, डॉमनिका डाबरे, मॅकेन्झी डाबरे, जितेंद्र सत्पाळकर, क्लीमेंट गोनसालवीस, पायस मचाडो, कुमार राऊत, संदेश घोलप यांच्यासह जनशक्ती आघाडी, विरार-वसई-पालघरचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या मोर्चाला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, हितेंद्र ठाकूर, कॉम्रेड विनोद निकोले, प्रमोद हिंदुराव यांच्यासह विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रांतील मान्यवरांनी संबोधित केले.

सकाळी दहा वाजल्यापासूनच मोर्चास्थळी नागरिकांची गर्दी होण्यास सुरुवात झाली होती. विविध संघटना, सामाजिक संस्था आणि स्थानिक नागरिक मिळेल त्या वाहनाने तसेच पदयात्रा काढून मोर्चात सहभागी झाले. सभेसाठी उभारण्यात आलेला मंडप पूर्णपणे भरला होता तर परिसरातील रस्त्यांवरही मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. प्रस्तावित वाढवण बंदर प्रकल्पामुळे स्थानिक कष्टकरी, आदिवासी आणि मच्छीमार समाजाच्या उपजीविकेवर परिणाम होण्याची भीती आंदोलकांनी व्यक्त केली. बंदर प्रकल्पासोबत परिसरात येणारे मोठे औद्योगिक प्रकल्प, नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर आणि पर्यावरणीय परिणाम याबाबतही यावेळी चिंता व्यक्त करण्यात आली. जलसंपत्ती, जंगल आणि जमिनीचे संरक्षण तसेच स्थानिकांच्या पारंपरिक हक्कांचे जतन करण्याची मागणी आंदोलकांनी केली.

'पाणी आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं!', 'जंगल आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं!' आणि 'जमीन आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची!' अशा घोषणांनी संपूर्ण परिसरात आंदोलनाचा आवाज बुलंद झाला होता. या मोर्चातून सरकारच्या विकास धोरणांवरही तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. विकासाच्या नावाखाली स्थानिकांचे पारंपरिक व्यवसाय, उपजीविका आणि पर्यावरण धोक्यात येऊ नये, अशी भूमिका उपस्थितांनी मांडली. विनाशकारी ठरणारे प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीवर आंदोलक ठाम असल्याचे या जनआक्रोशातून स्पष्ट झाले.

मोर्चातील प्रचंड जनसहभागामुळे विविध संघटनांच्या प्रतिनिधींना एकमेकांशी संपर्क साधणेही कठीण झाले होते. जल, जमीन आणि जंगलाच्या संरक्षणासाठी स्थानिक नागरिकांनी एकजुटीने आवाज उठविल्याने हा मोर्चा परिसरातील आंदोलनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला. या मोर्चात सहभागी झालेले महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य प्रा.प्रवीण देशमुख यांनी कष्टकरी व आदिवासी समाजाच्या हक्कांच्या लढ्याला पाठिंबा व्यक्त केला.

तालुका प्रशासनाच्या वतीने

शेतकऱ्यांकरीता 'खेत बचाव अभियान' उत्साहात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शेती व पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी तालुका प्रशासनाच्या वतीने 'खेत बचाव अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष बांधावर जाऊन मार्गदर्शन करण्यासोबतच संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन दिले जात आहे. याच अभियानाचा एक भाग म्हणून रवाळा येथे कृषी विभाग व आत्मा यांच्या माध्यमातून पर्यावरण समतोल शेतकरी बचत गटातील शेतकऱ्यांना ज्वारी बियाण्यांचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे, केवळ बियाणे वाटप व मार्गदर्शन न करता उपस्थित मान्यवरांच्या सहभागातून शेतात ज्वारीची प्रत्यक्ष पेरणी करण्यात आली.

या उपक्रमाला उपविभागीय अधिकारी सौरभ गावंडे, तहसिलदार रामदास शेळके, तालुका कृषी अधिकारी रेहान मुजावर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंडळ कृषी अधिकारी मनीष भागवत, सहाय्यक कृषी अधिकारी मनोज भाकरे, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक लक्ष्मीकांत श्रीराव, हेमंत बरांगे तसेच पर्यावरण समतोल शेतकरी बचत गटाचे सदस्य व शेतकरी उपस्थित होते.

वरूड तालुका हा प्रामुख्याने संत्रा व मोसंबी या फळिपकांसाठी ओळखला जातो. तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांचे अर्थकारण या फळिपकांवर अवलंबून आहे. मात्र, सध्याच्या दुष्काळी परिस्थितीमुळे पाणीटंचाईबरोबरच आगामी काळात जनावरांसाठी हिरव्या चाऱ्याची उपलब्धता कमी होण्याची शक्यता आहे.

ही संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन पशुधनाचे संरक्षण, शेतीचे आर्थिक स्थैर्य आणि ग्रामीण अर्थव्यवस्था टिकविण्यासाठी तालुका प्रशासनाने वेळीच उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे.

यावेळी उपविभागीय अधिकारी सौरभ गावंडे व तहसीलदार रामदास शेळके यांनीही शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तालुका प्रशासनाच्या 'खेत बचाव अभियान' अंतर्गत शेतकऱ्यांना केवळ कार्यालयीन स्तरावर सूचना न देता प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन केले जात आहे.

शेतीतील उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर, पर्यायी पिकांचे नियोजन, चारा पिकांची लागवड आणि पशुधनासाठी चारा उपलब्धता यावर विशेष भर दिला जात आहे.

रवाळा येथील कार्यक्रमात पर्यावरण समतोल शेतकरी बचत गटाला ज्वारी बियाण्यांचे वाटप करून प्रत्यक्ष पेरणी करण्यात आल्याने या अभियानाला कृतीची जोड मिळाली आहे. ज्वारीसारख्या चारा पिकांच्या लागवडीमुळे भविष्यात जनावरांसाठी हिरवा चारा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे तसेच शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतात चारा उत्पादन घेण्याची प्रेरणा मिळणार आहे.

संत्रा-मोसंबी उत्पादक म्हणुन ओळख असलेल्या वरूड तालुक्यात शेतीच्या मुख्य पिकांसोबतच पशुधनासाठी चारा उत्पादनाचे नियोजन करणे ही काळाची गरज बनली आहे. दुष्काळी परिस्थितीचा सामना करताना शेती आणि पशुधन दोन्ही सुरक्षित ठेवण्याच्या उद्देशाने तालुका प्रशासनाने हाती घेतलेले 'खेत बचाव अभियान' महत्त्वपूर्ण ठरत आहे.

लासलगाव बाजार समितीत मक्याला दहा वर्षांतील उच्चांकी भाव : प्रतिक्विंटल ३ हजारांचा टप्पा पार!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



लासलगाव – पिवळे सोने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मक्याला यंदा बाजारात सोन्यासारखा भाव मिळू लागला आहे.

लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत मक्याने गेल्या दहा वर्षांतील उच्चांकी दराची नोंद करत प्रतिक्विंटल ३ हजार रुपयांचा टप्पा गाठला आहे. मात्र, वाढलेल्या बाजारभावाचा उत्पादनात घट झाल्याने अपेक्षित फायदा शेतकऱ्यांना मिळत नसल्याचे चित्र आहे.

गेल्या वर्षी लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत मक्याला जास्तीत जास्त २ हजार ३०१ रुपये, कमीत कमी ७०० रुपये, तर सरासरी १ हजार ८५१ रुपये प्रतिक्विंटल बाजारभाव मिळाला होता. यंदा मात्र मक्याच्या दरात मोठी सुधारणा झाली आहे. सध्या जास्तीत जास्त ३ हजार रुपये, कमीत कमी २ हजार १०१ रुपये, तर सरासरी २ हजार ९२१ रुपये प्रतिक्विंटल बाजारभाव मिळत आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत मक्याच्या कमाल बाजारभावात प्रतिक्विंटल ६९९ रुपयांची, तर सरासरी बाजारभावात तब्बल १ हजार ७० रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे चांगल्या बाजारभावाची संधी निर्माण झाली असली, तरी उत्पादन घटल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर मर्यादा येत आहेत. गेल्या दहा वर्षांतील उच्चांकी बाजारभाव मिळाल्याने लासलगाव बाजार समितीत मक्याच्या दराची चर्चा सुरू आहे.

शेतकऱ्यांनी मका व्यवस्थित वाळवून आणि योग्य प्रतवारी करून विक्रीस आणल्यास चांगला बाजारभाव मिळण्यास मदत होईल, असे बाजार समितीचे सभापती डी.के. जगताप यांनी सांगितले.

तापमान

	कमाल	किमान
अमरावती	२९	२४
यवतमाळ	२८	२१
अकोला	२७	२४
वाशिम	२८	२३
बुलढाण	२७	२२
वर्धा	३०	२३
नागपूर	२९	२४
चंद्रपुर	२९	२५
गडचिरोली	२८	२३
नाशिक	२६	२२
पुणे	३०	२१

ढंड थकवणाऱ्यांना 'अभय': ढंडावर २० टक्के सवलत, राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




मुंबई – वाहतूक नियमांचे उल्लंघन करून ई-चलानचा दंड वर्षानुवर्षे थकवणाऱ्या वाहनधारकांना राज्य सरकारने शेवटची संधी दिली आहे. तब्बल ५ हजार ९१६ कोटी रुपयांचा थकित दंड वसूल करण्यासाठी 'महाराष्ट्र वाहतूक पोलीस अभय योजना-२०२६' ला बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. थकीत दंडाच्या वसुलीसाठी दंडाच्या रकमेवर २० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जाणार आहे. ही योजना तीन टप्प्यात राबवली जाणार आहे. परिवहन विभाग आणि वाहतूक पोलीस विभागाने एकूण १२.४० कोटीची चलान बजावली आहेत. त्याद्वारे १० हजार ३५० कोटी ६५ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. यापैकी ४ हजार ४३३ कोटी ८७ लाख रुपये वसूल झाले असून तब्बल ५ हजार ९१६ कोटी ७८ लाख रुपयांचा दंड अद्याप प्रलंबित आहे. एकूण दंडाच्या रकमेपैकी केवळ ४२.८४ टक्के वसुली झाली आहे. परिवहन विभागाची वसुली ५९.२३ टक्के, तर वाहतूक पोलीस विभागाची वसुली ३६.०९ टक्के आहे. दंडाच्या रकमेवर एकवेळची सवलत थकीत दंडाची वसुली व्हावी आणि वाहतूक नियमांचे पालन करण्यास प्रोत्साहन मिळावे, यासाठी राज्यातील तडजोड पात्र थकीत दंडाच्या रकमेवर एकवेळची सवलत म्हणून २० टक्केपर्यंत सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, अभय योजनेची मुदत संपल्यानंतरही वारंवार वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

रुग्णांचे प्राण वाचविणारे सुरेश बिजवे होणार सन्मानित

मध्यप्रदेश शासनाच्या परिवहन विभागाने घेतली दखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





वरुड – अपघात घडला की दुरुन जाणारे अनेक जण आपण बघितले आहेत परंतु अपघात घडल्यानंतर स्वत: कारमध्ये जखमींना टाकून त्यांना उपचाराकरीता रुग्णालयात आणणाऱ या जरुडच्या सुरेश बिजवे यांच्या कार्याची दखल मध्यप्रदेश परिवहन विभागाने घेत त्यांना सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या ११ जुलै २०२५ रोजी सुरेश बिजवे यांच्या तातडीच्या मदतीमुळे मध्यप्रदेशातील गेहुबारसा येथील दोघे अपघातामध्ये जखमी झाले होते, त्यांना तातडीने वैद्यकीय मदत पोहचावी, म्हणुन सुरेश बिजवे यांनी जखमींना रुग्णालयात पोहचविले होते आणि त्यांचे प्राण सुध्दा वाचले होते. त्यांच्या या कार्याची दखल घेत मध्यप्रदेश शासनाने त्यांना ५ हजार रुपयांचे रोख बक्षिस आणि सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे.

सविस्तर माहितीनुसार, तालुक्यातील पांढरघाटी ते मध्यप्रदेशातील गहूबारसा रस्त्यावर ११ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५.३० च्या सुमारास दोन दुचाकीची जोरदार धडक दिली. या धडकेत दोन्ही दुचाकीस्वार रविंद्र दयाराम कुमरे (३८) व शिवचरण छन्नू युवने (३२) गंभिर जखमी झाले. गंभिरावस्थेत दोघेही रस्त्यावर पडून होते. याच सुमारास जरुड येथील मुळचे रहिवाशी असलेले सुरेश बिजवे हे त्यांच्या मालकीच्या कारने मध्यप्रदेशातील भालखेडा येथे शेतातील कामाकरीता मजुर आणण्याकरीता जात असतांना अपघात झाल्याचे व दोन जखमी रस्त्यावर पडून असल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी कार थांबवुन दोन्ही जखमींना कारमध्ये टाकले आणि दोघांनाही घेवुन सर्वप्रथम बेनोडा (शहीद) पोलिस स्टेशन आणि तेथून थेट वरुडचे ग्रामीण रुग्णालय गाठले. त्या ठिकाणी डॉक्टरांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांना नागपुर येथे पुढील उपचाराकरीता रवाना करण्यात आले होते. वेळेवर उपचार मिळाल्याने दोघांचेही प्राण वाचले होते. सुरेश बिजवे यांच्या कार्याची मध्यप्रदेश परिवहन विभागाने दखल घेत त्यांना ५ हजार रुपये रोख आणि त्यांना सन्मानित करण्याचा निर्णय घेतला असुन त्यांचे सर्वत्र कौतुक केल्या जात आहे.

शिवाजी हायस्कूलच्या मैदानावर विजयादशमी उत्सव साजरा

'वंदे मातरम' हा स्वातंत्र्यलढ्याचा क्रांतिमंत्र : प्रा.निखिल मोहोड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मोर्शी – देश स्वतंत्र करण्यासाठी 'वंदे मातरम' हा मंत्र म्हणून १४८ क्रांतिकारी फाशीच्या फासावर चढले व त्यांचा शेवटचा शब्दही 'वंदे मातरम' असाच होता, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अमरावती जिल्हा कार्यवाह प्रा. निखिल मोहोड यांनी केले. विजयादशमी उत्सवानिमित्त मोर्शी येथील शिवाजी हायस्कूलच्या मैदानावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मोर्शी नगर शाखेच्या वतीने ९ नोव्हेंबर रोजी विजयादशमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पथकाने भगव्या ध्वजाला मानवंदना देऊन केली. त्यानंतर शिवाजी हायस्कूल येथून घोषपथकासह संचलनाला सुरुवात झाली.

विजयादशमीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे शहरातून घोषपथकासह पथसंचलन करण्याची परंपरा आहे. हे संचलन जयस्तंभ चौकातून मुख्य बाजारपेठ, गांधी मार्केट मार्गे काढण्यात आले. त्यानंतर संचलनाची सांगता



शिवाजी हायस्कूलच्या मैदानावर झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने १०१ वर्षे पूर्ण केल्याच्या औचित्याने शिवाजी हायस्कूलच्या मैदानावर भारतमाता व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ.केशव बळीराम हेडगेवार यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. निखिल मोहोड, तर प्रमुख अतिथी म्हणून मोर्शी अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे व्यवस्थापकीय संचालक प्रणित यावलीकर उपस्थित होते. तसेच तालुका संघचालक मनोहर घुलक्षे आणि नगर कार्यवाह अमोल लांडे यांची उपस्थिती होती. प्रमुख अतिथी प्रणित यावलीकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पंचपरिवर्तनाची पंचसूत्रे केवळ विचारांपुरती मर्यादित न ठेवता ती दैनंदिन जीवनात आचरणात आणली पाहिजेत. त्यातून सशक्त समाज आणि समर्थ राष्ट्रनिर्मितीचा मार्ग अधिक बळकट होईल, असा संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमादरम्यान स्वयंसेवकांच्या वतीने विविध कवायती सादर करण्यात आल्या. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन नगर कार्यवाह अमोल लांडे यांनी केले.

मोर्शीत सात फूट लांबीच्या अजगराचे यशस्वी रेस्क्यू

❊ वारसा संस्थेच्या सर्पमित्रांची तत्परता
❊ वनविभागाच्या मदतीने अजगराला जंगलात सोडले

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मोर्शी – मोर्शी-चांदूर बाजार मार्गावरील हनुमान मंदिराजवळ मंगळवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी रस्ता ओलांडताना सुमारे सात फूट लांबीचा भला मोठा अजगर आढळून आला. अजगर दिसताच परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी जमली. यावेळी वारसा संस्था, मोर्शीच्या टीमने तत्काळ सर्पमित्र हर्ष गलपट यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच सर्पमित्र हर्ष गलपट यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत अजगराला सुरक्षितरीत्या रेस्क्यू केले. या मोहिमेत सर्पमित्र विजय फुसे, लक्की कुसरे, अभिषेक खडसे, तेजस चिखले, ईश्वर धुर्वे आणि प्रणव सोनोने यांनी सहकार्य केले. त्यानंतर वनविभागाचे निखिल गोरे यांच्या मदतीने या अजगराला सुरक्षितपणे जंगलात सोडून देण्यात आले. सर्पमित्रांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे अजगराला कोणतीही इजा न होता त्याला नैसर्गिक अधिवासात सोडणे शक्य झाले. या कार्याचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

दिवाळीत गावी जाणं महागलं!

खासगी बसच्या तिकीट दरांत थेट दुप्पट-तिप्पट वाढ, प्रवासी संतापले

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – दिवाळीच्या सुट्टीत गावी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढल्याने खासगी बसचालकांनी भाड्यात दुप्पट ते तिप्पट वाढ केली आहे. काही मार्गांवर खासगी बसचे भाडे तब्बल सात हजार रुपयांपर्यंत वाढविल्याने प्रवाशांमध्ये संताप व्यक्त होत आहे. खासगी बसचे भाडे थेट विमानाच्या तिकीटदराशी बरोबरी करीत असल्याटी टीका प्रवाशांनी केली आहे.

खासगी बसच्या वाढत्या भाड्याच्या अनुषंगाने अनेक प्रवाशांनी समाजमाध्यमांवर परिवहनमंत्री प्रताप सरनाईक आणि परिवहन विभागावर टीका केली आहे. खासगी बसच्या भाड्यावर नियंत्रण ठेवण्यात परिवहन विभाग अपयशी ठरल्याचा आरोपही प्रवाशांनी केला आहे. एका मार्गावरील बसचे भाडे ७०० रुपयांवरून चार हजार रुपयांपर्यंत वाढल्याचा दावा एका प्रवाशाने समाजमाध्यमांवर केला आहे. खासगी बसच्या भाड्यावर कोणतेही सरकारी नियंत्रण नाही का? तिकिटांचे दर सहा ते सात हजार रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. हे दर विमानाच्या तिकिटांइतकेच आहेत. ऐनवेळी तिकीट काढणाऱ्या प्रवाशांनी काय करायचे, असा संतप्त सवाल एका प्रवाशाने केला.

खासगी कंत्राटी बसची विशेष तपासणी मोहीम दुसऱ्या एका प्रवाशाने परिवहनमंत्री झोपले आहेत की झोपेचे सोंग घेत आहेत, असा सवाल उपस्थित केला. मुंबई आणि पुण्यासारख्या शहरांमध्ये वर्षभर मेहनत करणारे नागरिक दिवाळीत कुटुंबीयांसोबत आनंदाचे काही क्षण घालवण्यासाठी गावी जाण्याची प्रतीक्षा करतात. अशा वेळी बसचे भाडे ७०० रुपयांवरून चार हजार रुपये कसे होऊ शकते, असा प्रश्न उपस्थित करत संबंधित प्रवाशाने तिकीट बुकिंग ॲपचे स्क्रीनशॉटही शेअर केले.

खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या पुढाकाराने लाडकी येथे दुष्काळी परिस्थितीचा आढावा : विशेष ग्रामसभा संपन्न

शेतकरी व पशुधनाच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाला निर्देश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मोर्शी – तालुक्यातील लाडकी (चिमणाजी) येथे राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी बोलाविलेल्या विशेष आढावा बैठकीत दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार आयोजित या बैठकीत शेतकरी व ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेत तातडीच्या उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी ग्रामस्थ व शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून गावातील पाणीटंचाईसह विविध समस्यांचा आढावा घेण्यात आला. सार्वजनिक विहिरींचे खोलीकरण करणे, नळ योजनेद्वारे नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करणे, गावातील गुराढोरांची संख्या लक्षात घेऊन त्यांच्या पिण्याच्या पाण्याची व चाऱ्याची व्यवस्था करणे, अशा महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली.

तसेच कोल्हापुरी बंधाऱ्यांची दुरुस्ती व योग्य व्यवस्थापन करणे, नाल्यांचे खोलीकरण करून गाळ काढण्याची कामे प्राधान्याने हाती घेणे, याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश देण्यात आले. दुष्काळी परिस्थितीत शेतकरी, ग्रामस्थ आणि पशुधनाला दिलासा मिळावा यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्यावर भर देण्यात आला.

या बैठकीला तहसीलदार सागर ढवळे, गटविकास अधिकारी स्वप्निल मगदूम, तालुका कृषी अधिकारी प्रथमेश माने, शिरखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ईश्वर वर्गे, ग्रामपंचायत प्रशासक सुजाता देशमुख, वनपरिक्षेत्र अधिकारी योगिता मगर, महावितरण अभियंता, जलसंपदा व जलसंधारण विभागाचे अधिकारी, ग्रामपंचायत सचिव बाळासाहेब गावंडे, तलाठी आकाश चव्हाण, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे वेधणार लक्ष : संघटनाचे पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन : डॉ .श्याम पंचवटे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



भंडारा – महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संयुक्त कृती समितीतर्फे ५ नोव्हेंबर २०२६ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ते उच्च शिक्षण संचालक कार्यालय, पूणे येथे धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रलंबित मागण्यांना त्वरित न्याय मिळावा यासाठी राज्यातील सर्व विध्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संयुक्त कृती समिती आणि महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर कर्मचारी महासंघ वतीने आंदोलन पुकारण्यात आले असल्याची माहिती शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे कार्याध्यक्ष श्री विजयकुमार घरत, महासंघ प्रतिनिधी डॉ.शाम पंचवटे, रोशन भोयर, विदर्भ संघटनेचे अध्यक्ष दिलीप उपासे, विदर्भ कार्याध्यक्ष महेश कुथे, महासचिव संदीप हिवरकर यांनी दिली. या मोर्चात जिल्हातील सर्व संघटनाचे पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष प्रकाश म्हसे, महासचिव रावसाहेब त्रिभुवन तसेच संयुक्त कृती समितीचे प्रमुख अजय देशमुख यांनी केले आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत आश्वासित योजनेचे १०,२० आणि ३० वर्षाचे तीन लाभ तात्काळ लागू करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आठवड्यातून पाच दिवसांचे काम लागू करणे, प्रयोगशाळा व ग्रंथालय परिचरांना सुधारीत ग्रेड पे वेतन लागू करणे, विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तात्काळ भरणे आणि कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे या मागण्यांसाठी शासनाचे लक्ष वेधले जाणार आहे. सदर मोर्चाला विदर्भातून जास्तीत जास्त कर्मचारी बंधूंनी उपस्थित राहण्याचे आव्हान महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधी डॉ.श्याम पंचवटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.१००५/२०२६ **ने.ता.११/१२/२०२६**

अर्जदार :-

सुशीला गजानन तिजारे

वय अं.६६ वर्ष, धंदा-घरकाम

रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत हितेश गजानन तिजारे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.११/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०२/११/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३ (२) अन्वये जन्माची नोंद वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी व फौजदारी न्यायाधिश, वरुड यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.३१७/२०२६ **ने.ता.२३/१२/२०२६**

अर्जदार :- रविंद्र लक्ष्मणराव परतेती

वय अं.४८ वर्ष, धंदा-मजुरी

रा.जामगांव, ता.आष्टी, जि.वर्धा

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मा.सचिव साहेब

ग्रामपंचायत कार्यालय काचुर्णा, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार स्वत: नामे **रविंद्र लक्ष्मणराव परतेती यांचा जन्म दि.०२/०५/१९७८ रोजी रा.काचुर्णा, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास **रविंद्र लक्ष्मणराव परतेती यांचा जन्म दि.०२/०५/१९७८ रोजी रा.काचुर्णा, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०३/११/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

माँ दुर्गा महिला प्रभाग संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

५ महिला बचत गटांना ६० लाखांचे कर्जवाटप : ४ महिलांना व्यवसायासाठी प्रत्येकी एक लाखाचा धनादेश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



अंबाडा – माँ दुर्गा महिला प्रभाग संघ, सावरगाव यांची वार्षिक सर्वसाधारण सभा २८ ऑक्टोबर २०२६ रोजी गोपाल सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी वर्षा विजय दळवी होत्या, तर पंचायत समिती नरखेडचे कार्यालयीन अधीक्षक संगेवार यांच्या हस्ते सभेचे उद्घाटन करण्यात आले.

सभेदरम्यान वार्षिक अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच मागील वर्षाच्या कामकाजाचा आढावा आणि सन २०२६ चा लेखापरीक्षण अहवाल सादर करण्यात आला. यावेळी महिलांनी वैयक्तिक व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक प्रगती साधावी, व्यवसायाचा विस्तार करावा तसेच बचतीची सवय वाढवावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी बँक ऑफ इंडिया, सावरगाव शाखेच्या वतीने पाच स्वयं सहायता समूहांना एकूण ६० लाख रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले. तसेच नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी चार महिलांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे धनादेश प्रदान करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी होण्यासाठी मोठे पाठबळ मिळणार आहे.

याशिवाय सेवा संकल्प अभियानांतर्गत मोफत वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सहभागी झालेल्या स्टॉलधारक महिला तसेच आपल्या कार्यातून यशोगाथा निर्माण करणाऱ्या महिलांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला विविध शासकीय विभागांचे अधिकारी, बँकेचे प्रतिनिधी, ग्रामसंघाचे पदाधिकारी आणि परिसरातील मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पौर्णिमा देऊळकर यांनी केले, तर मनीषा कुमरे यांनी आभार प्रदर्शन केले.

महिलांचे संघटन, आर्थिक स्वावलंबन, बचत आणि उद्योजकतेला चालना देणारी ही वार्षिक सर्वसाधारण सभा महिलांसाठी प्रेरणादायी ठरली.



दिवाळीआधी एफडीएची मोठी कारवाई

राज्यव्यापी धडक मोहिमेत १८ अन्न व्यवसाय परवाने निलंबित, ४ आस्थापनांचे कामकाज केले बंद

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – सणासुदीच्या पार्श्वभूमीवर, संशयित भेसळयुक्त आणि निकृष्ट अन्नपदार्थांविरोधात महाराष्ट्र अन्न आणि औषध प्रशासनाने (एफडीए) राज्यव्यापी धडक मोहीम राबवून १८ अन्न व्यवसाय परवाने निलंबित केले आहेत आणि ४ आस्थापनांचे कामकाज बंद पाडले आहे.

परवाने निलंबित केलेल्यांमध्ये मुंबईतील पाच, पुण्यातील सहा, छत्रपती संभाजीनगरमधील पाच आणि अमरावती विभागातील दोन आस्थापनांचा समावेश आहे. अनेक ठिकाणी खाद्यपदार्थांच्या तयारी आणि साठवणुकीत गंभीर निष्काळजीपणा आढळून आल्याचे विभागाने म्हटले आहे.

यासोबत एफडीएने पुणे येथील तीन आणि अमरावती येथील एका आस्थापनेसह एकूण चार अन्न आस्थापनांचे कामकाज बंद केले आहे. ३६ अन्न आस्थापनांच्या तपासणीदरम्यान, अधिकाऱ्यांनी सुमारे १४,३४० किलो खाद्यपदार्थ आणि २०४ लिटर कोकम जप्त केले, ज्याची एकूण किंमत ३७.४९ लाख रुपये आहे. मिठाई, दुग्धजन्य पदार्थ, फराळ, मसाले, खाद्यतेल आणि सुकामेवा (ड्रायफ्रूट्स) तयार करणारे उत्पादक, साठा करणारे व्यावसायिक आणि विक्रेत्यांना लक्ष्य करत ३ नोव्हेंबर रोजी राज्यातील सातही विभागांमध्ये ही विशेष तपासणी मोहीम राबवण्यात आली. दोन गुन्हे, तिघांना अटक

याशिवाय, प्रतिबंधित अन्नपदार्थांविरोधातील एका कारवाईत, एफडीएने दोन ठिकाणांहून १६.८६ लाख रुपये मूल्याचा गुटखा, पान मसाला, सुवासिक तंबाकू आणि तत्सम पदार्थ जप्त केले. या जप्तीच्या संबंधात दोन एफआयआर दाखल करण्यात आले असून तिघांना अटक करण्यात आली आहे.

एफडीएचे आवाहन एफडीएने नागरिकांना केवळ परवानाधारक विक्रेत्यांकडूनच अन्नपदार्थ खरेदी करण्याचे आणि लेबल, बॅच नंबर, पॅकिंगची तारीख तसेच बेस्ट-बिफोर (वापरण्याची अंतिम तारीख) तपशील तपासण्याचे आवाहन केले आहे. ग्राहक कोणत्याही संशयास्पद किंवा निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांबद्दल १८००-२२२-३६५ या टोल-फ्री हेल्पलाइनवर किंवा विभागाच्या तक्रार निवारण पोर्टलवर तक्रार नोंदवू शकतात.

दिवाळी अंक खरेदीला उत्स्फूर्त प्रतिसाद

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – दिवाळी सणाचा अविभाज्य घटक असलेल्या दिवाळी अंकांची परंपरा सुमारे ११७ वर्षांची आहे.

डिजिटल माध्यमे आणि वाचन संस्कृती कमी होत असल्याबद्दल चर्चा सुरू असतानाच दिवाळी अंकांची परंपरा आजही राज्याने जपली आहे. दिवाळी सुरू होण्यापूर्वीच बाजारात आलेले दिवाळी अंक खरेदी करण्यासाठी दुकानांमध्ये वाचकांची गर्दी होऊ लागली आहे.

महागाई तही दिवाळी अंकांच्या किमती स्थिर असून खरेदीला वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभत आहे.

गेल्या अनेक दशकांपासून दिवाळीच्या निमित्ताने विविध विषयांवरील अंक प्रकाशित करण्याची परंपरा आहे.

'ते' कायदे आता कालबाह्य - सर्वोच्च न्यायालय

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



नवी दिल्ली – देशात दोनपेक्षा जास्त अपत्ये असलेल्या व्यक्तींना निवडणुकीसाठी अपात्र ठरवणारे किंवा दंड करणारे कायदे आता कालबाह्य झाले आहेत, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी नोंदवले आहे. गेल्या काही दशकांत देशातील लोकसंख्याशास्त्रीय बदलांमुळे अतिलोकसंख्येची भीती आता संपुष्टात आली आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्या. पी. एस. नरसिंह आणि न्या. आलोक आराध्ये यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. मंगला भीमराव इंगळे या काकोडा ग्रामपंचायतीच्या 'सरपंच' म्हणून निवडून आल्या होत्या. मात्र, त्यांना दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्याच्या कारणावरून, 'महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९' च्या कलम १४(१)(ज-१) नुसार त्यांना निवडणुकीसाठी अपात्र ठरवण्यात आले आणि त्यांची निवड रद्द करण्यात आली होती. या निर्णयाविरोधात त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

पदवीधरांनी स्वतःच्या ध्येयाचे शिल्पकार व्हावे, कुलपती जिष्णु देव वर्मा यांचे आवाहन

मराठवाडा विद्यापीठाचा ६७ वा दीक्षांत सोहळा संपन्न

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



छत्रपती संभाजीनगर – डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६७ वा दीक्षांत समारंभ राज्याचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.४ नोव्हेंबर) विद्यापीठाच्या नाट्यगृहात संपन्न झाला. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर हा सोहळा अत्यंत साधेपणाने आयोजित करण्यात आला. मुंबई येथील इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे (आयसीटी) कुलगुरू प्रा.अनिरुद्ध पंडित प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ.विजय फुलारी, प्रकुलगुरू डॉ.प्रवीण वक्ते, लोकभवनचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, कुलसचिव डॉ.संजय कवडे, परीक्षा मंडळाचे संचालक डॉ.बी.एन.डोळे यांच्यासह विद्याशाखांचे अधिष्ठाता, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

पदवी घेऊन विद्यापीठातून बाहेर पडताना विद्यार्थ्यांचे विद्यापीठाशी असलेले नाते बदलणार आहे. आता ते विद्यापीठाचे भागीदार बनणार असून, स्वतःच्या ध्येयाचे शिल्पकारही आपणच आहोत, याची जाणीव त्यांनी ठेवावी, असे आवाहन प्रकुलगुरू डॉ.प्रवीण वक्ते यांनी केले. प्राप्त झालेली पदवी हे अंतिम ध्येय नसून जीवनप्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

विद्यार्थ्यांनी जीवनात मिळिवलेले यश विद्यापीठासाठी अभिमानास्पद ठरेल, असेही ते म्हणाले. यावेळी त्यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा अहवाल सादर केला. दीक्षांत मिरवणुकीने मान्यवरांचे सभागृहात आगमन झाल्यानंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. कुलपतींनी दीक्षांत समारंभ सुरू झाल्याची घोषणा केली.

त्यानंतर विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र, मानव्यविद्या आणि आंतरविद्याशाखांतील पदव्यांचे वाचन संबंधित अधिष्ठात्यांनी केले. प्रारंभी वंदे मातरमब, राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीत सादर करण्यात आले. डॉ. मुस्तजीब खान आणि डॉ. गणेश शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

३३४ संशोधकांना पीएच.डी. पदवी यंदाच्या दीक्षांत समारंभात एकूण ३३४ संशोधकांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. ६ जानेवारी ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत पीएच.डी. प्राप्त केलेल्या संशोधकांचा यात समावेश आहे. यामध्ये मानव्यविद्या शाखेतील १३१, विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतील १२४, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र शाखेतील ३१ आणि आंतरविद्याशाखेतील ४८ संशोधकांचा समावेश आहे, अशी माहिती परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. बी. एन. डोळे यांनी दिली.

राजू शेट्टींच्या आंदोलनाचा तिसरा दिवस, आंदोलनातील नेमक्या मागण्या काय अन कोंडी फोडण्यासाठी कितीवर तडजोडची तयारी? आज चेअरमन, संचालकांच्या दारात 'शिमगा' आंदोलन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने ऊसाला पहिली उचल ४५०० रूपये मिळावी या मागणीसाठी पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर सुरू असलेल्या 'रास्ता रोको' आंदोलनाचा आज (५ नोव्हेंबर) तिसरा दिवस आहे. माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशीही हजारो शेतकऱ्यांनी किणी टोल नाक्यावर ठिय्या मांडून महामार्ग रोखून धरला. सातारा जिल्ह्यातील नागठाणेमध्येही आंदोलन सुरु असल्याने महामार्गावर अभूतपूर्व कोंडी झाली आहे. त्यामुळे साताऱ्यातून व्हाया सांगली वळसा घालून वाहने कोल्हापूरच्या दिशेनं येत आहेत. मात्र, अवजड वाहतूक महामार्गावर ठप्प झाली आहे. या आंदोलनामुळे पुणे-बेंगलोर महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. मागण्या मान्य झाल्याशिवाय महामार्गावरून एक इंचही मागे हटणार नाही, असा निर्धार आंदोलक शेतकऱ्यांनी केला आहे. चेअरमन आणि संचालकांच्या दारात 'शिमगा' आंदोलन किणी टोल नाक्यावरील शेतकरी सभेत बोलताना राजू शेट्टी यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला. जर सरकार आणि साखर कारखानदार यांच्या आडमुठेपणामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना यंदाची दिवाळी रस्त्यावर साजरी करावी लागत असेल, तर स्वाभिमानीचे कार्यकर्ते आणि शेतकरी साखर कारखान्यांचे चेअरमन आणि संचालकांच्या दारात शिमगा आंदोलन करतील,' असा थेट इशारा राजू शेट्टी यांनी दिला.



